श्री. नितीन गायकवाड,

सहाय्यक पोलीस निरीक्षक (अंमु)

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय,

नाशिक.

# चान्सप्रिंट

घटनास्थळी आरोपीने हाताळलेल्या वस्तूंवर त्याचे कळत-नकळत जे ठसे उमटलेले असतात त्यांना चान्सप्रिंट असे म्हणतात.

# चान्सप्रिंटचे एकूण तीन प्रकार

1. **साचेबध्द ठसा** (Plastic Print)
2. **दृश्य ठसा** (Visible Print)
3. **अदृश्य ठसा** (Unvisible/Latent Pnt)

## 1. साचेबध्द ठसा (Plastic Print) :-

**कोणत्याही नरम अथवा मृदू वस्तूवर/पदार्थावर दाब पडल्यानंतर उमटलेल्या ठशास साचेबध्द ठसा असे म्हणतात. याप्रकारच्या ठशांना कोणत्याही प्रकारे विकसित करण्याची आवश्यकता नसते. घटनास्थळी साचेबध्द ठसा मिळून आल्यास तात्काळ संरक्षित करुन सूक्ष्म (Micro) छायाचित्रण (Photography) करुन घ्यावे.**

- **साचेबध्द ठसा उमटणा-या वस्तूंचा पृष्ठभाग**

  नरम अथवा मृदू पृष्टभाग

- **साचेबध्द ठसे कशावर उमटतात**

  चिखल, डांबर, वितळलेले मेण, साबण, ग्रीस, चॉकलेट बार किंवा कोणत्याही नरम अथवा मृदू पृष्टभागावर.

- **साचेबध्द ठसा विकसित (Develop) करण्याची पध्दत**

  साचेबध्द ठशांना कोणत्याही प्रकारे विकसित करण्याची आवश्यकता नसते.

- **साचेबध्द ठसा उमटण्याची कारणे**

  योग्य प्रमाणात दाब पडल्यानंतर.

- **साचेबध्द ठसापुरावा म्हणून कशा पध्दतीने घेण्यात येतो**

  छायाचित्रण (Photography).

## 2. दृश्य ठसा (Visible Print):-

**कोणताही रंग असलेला पदार्थ तळहात किंवा तळपायाला लागल्यानंतर वस्तूवर ठसे उमटलेले असतील तर अशा ठशांना दृश्य ठसे असे म्हणतात. दृश्य ठसे सपाट पृष्टभागवार उमटतात. याप्रकारच्या ठशांना कोणत्याही प्रकारे विकसित करण्याची आवश्यकता नसते. घटनास्थळी दृश्यठसा मिळून आल्यास तात्काळ संरक्षित करुन सूक्ष्म (Micro) छायाचित्रण (Photography) करुन घ्यावे.**

## दृश्य ठसा उमटणा-या वस्तूंचा पृष्ठभाग

सपाट पृष्टभाग

## दृश्य ठसा कशामुळे उमटतो

रक्त, रंग, शाई, ऑईल, ग्रीस, धूळ, पावडर किंवा कोणताही रंग असलेला पदार्थ.

## दृश्य ठसा विकसित (Develop) करण्याची पध्दत

दृश्य ठशांना कोणत्याही प्रकारे विकसित करण्याची आवश्यकता नसते.

## दृश्य ठसा उमटण्याची कारणे

योग्य प्रमाणात दाब पडल्यानंतर.

## दृश्य ठसा पुरावा म्हणून कशा पध्दतीने घेण्यात येतो

छायाचित्रण (Photography)

## 3. अदृश्य ठसा (Unvisible/Latent Print):-

अदृश्य ठसे गुळगुळीत व चकचकीत पृष्टभाग असलेल्या वस्तूंवर घामाच्या स्वरुपात उमटतात. रंगहीन घामामुळे वस्तूवर उमटणारे ठसे अदृश्य स्वरुपात असतात. अदृश्य ठसे डोळयांना स्पष्ट दिसत नसल्याने ते विकसित/ दृश्यमान करण्याची आवश्यकता असते. अदृश्य ठसे पावडरच्या सहाय्याने विकसित / दृश्यमान केले जातात.

### अदृश्य ठसा उमटणा-या वस्तूंचा पृष्ठभाग

गुळगुळीत व चकचकीत पृष्टभाग

### अदृश्य ठसा कशामुळे उमटतो

घाम

## अदृश्य ठसा विकसित (Develop) करण्याची पध्दत.

### पावडर पध्दत:-

अ)केमिकल पावडर

ब) मेटॅलिक पावडर

क) फलोरोसंट पावडर

### अदृश्य ठसा उमटण्याची कारणे

योग्य प्रमाणात दाब पडल्यानंतर.

### अदृश्यठसा पुरावा म्हणून कशा पध्दतीने घेण्यात येतो

छायाचित्रण (Photography)

### ठसे विकसित/दृश्यमान करण्याच्या पध्दती.

### 1) पावडर पध्दत:-

अ) केमिकल पावडर

ब) मेटॅलिक पावडर

क) फलोरोसंट पावडर

## 2) रासायनिक / द्रवरुप पध्दत(Liquids):-

अ) सिल्वर नायट्रेट प्रोसेस

ब) निनहायड्रीन प्रोसेस

## 3) गॅस/वाफ पध्दत (Vapors- (Fuming) & Ultra Violet Rays):-

आयोडिन फ्युमिंग पध्दत

**घटनास्थळी वस्तूंवर चान्सप्रिंट मिळून येणे किंवा मिळूनन येणे खालील बाबींवर अवलंबून असते**

1.स्पर्श केलेल्या वस्तूचे स्वरुप (नरम/सपाट/गुळगुळीत/चकचकीत/खडबडीत).

2.वस्तू हाताळतांना व्यक्तीची शारीरीक स्थिती.

3.तळहात व तळपायाच्या कातडीची स्थिती.

4.ठसे उमटतांना वस्तूवर पडलेला दाब.

5. सभोवतालची नैसर्गिक परिस्थिती.

# Thanks